# जाहिरात

उमेद – महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोनती अभियान (MSRLM), जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, वर्धा अंतर्गत ता. वर्धा, देवळी, सेलू व समुद्रपूर या तालुक्यात एकात्मिक शेती प्रभाग (IFC) प्रकल्पांतर्गत IFC सेवादाता पद्धतीने (IFC Block Anchor) (४ पदे) व वरिष्ठ समुदाय संसाधन व्यक्ती (Sr. CRP) (१५ पदे) ही दोन्ही पदे ११ महिनेच्या सेवादाता तत्वावर भरणेकरिता दि. २५/०९/२०२५ पर्यंत ऑफलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

याबाबतची सविस्तर जाहिरात व अर्जाचा नमुना www.zpwardha.in या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

स्वा /-

जिल्हा अभियान सहसंचालक

एमएसआरएलएम तथा

प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं. वर्धा

# जाहिरात

उमेद – महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोनती अभियान (MSRLM), जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, वर्धा अंतर्गत ता. वर्धा, देवळी, सेलू व समुद्रपूर या तालुक्यातील IFC प्रभागस्तरावर संसाधन व्यक्तीची ११ महिनेच्या सेवादाता तत्वावर निवड करावयाची असल्याने पात्रताधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

पदाचा तपशील :-

| | | |
|---|---|---|
| अ. क्र. १ | पदाचे नावे – | IFC - सेवादाता (Block Anchor) |
| | पद संख्या | ४ (तालुका वर्धा – १ पद, देवळी – १ पद, सेलू – १ पद, समुद्रपूर – १ पद) |
| | मानधन | प्रवास देयकासह दरमहा कमाल मानधन २०,०००/- प्रतिमाह<br>(निच्छित मासिक प्रवास देयक रु. २०००/- इतके राहील व मूल्यमापन अहवालानुसार मासिक मानधन अदा करण्यात येईल.) |
| | शैक्षणिक अर्हता | किमान कृषी व कृषी सलग्न पदवी जसे कि कृषी तंत्रज्ञान , Bachelor of science in Agriculture or Bachelor of Science in Horticulture or B.Tech.in Agriculture or Bachelor of science in Fishery, Bachelor of science in Forestry, Bachelor of Veterinary Science & Bachelor of Science in Animal Husbandry, Bachelor of Business Administration पदवीधारक असणे आवश्यक. |
| | अनुभव | कृषी क्षेत्रातला किमान १ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| | निवडीचे निकष | १. वय : कमाल ४३ वर्ष<br>२. कृषी, फलोत्पादन, मत्स्यपालन, पशु पालन, मधमाशी पालन इ. क्षेत्रातील शेती आधारित उपक्रम याबाबत माहिती असणे आवश्यक.<br>३. उत्तम संवाद कौशल्य असणे आवश्यक व समुदायाला सुलभरीतीने समजावून सांगता येणे आवश्यक.<br>४. शेती व शेती आधारित मूल्य वर्धन साखळी उपक्रम अंमलबजावणी बद्दल माहिती असणे आवश्यक.<br>५. तांत्रिक ज्ञान – संगणकीय ज्ञान असणे आवश्यक.<br>६. दुचाकी वाहन असणे आवश्यक. |
| | भूमिका व जबाबदाऱ्या | १. कार्यक्षेत्रातील प्रभागातील वरिष्ठ CRP इतर समुदाय संसाधन व्यक्ती यांच्याशी<br>नियमित समन्वय साधून प्रभागाचे कामाचे नियोजन करणे.<br>२. CRP यांच्याकडून प्रभागातील मुलभूत सर्वेक्षण करून, मिळालेल्या माहितीच्या आधारावर सूक्ष्म नियोजन आराखडा तयार करणे. व त्याची |

| | | |
|---|---|---|
| | | अंमलबजावणी करणे.<br>३. प्रभागस्तरावर प्रकल्पाचे निरीक्षण आणि मूल्यमापन करून सदरचा अहवाल LSC कार्यकारिणी समिती, जिल्हा व तालुका अभियान कक्षास अहवाल सादर क.णे.<br>४. प्रभागातील महिलांच्या उपक्रमांना (शेतातील पिके, शेतीआधारित उपक्रम) यांना प्रत्यक्ष भेटी देऊन कामाचा आढावा घेणे व आवश्यक मार्गदर्शन करणे.<br>५. प्रभागाचा मासिक कृती आराखडा तयार करून आराखडा प्रमाणे कामे होनेस्तव प्रयत्न करणे. तसेच सदर कामाचा अहवाल तालुका व्यवस्थापक आणि जिल्हा व्यवस्थापक उपजीविका यांना दरमहा सादर करणे.<br>६. प्रभागनिहाय प्रोडक्ट डेवलोपमेंट करून त्याची पॅकेजिंग, ब्रँडिंग व संबधित मार्केटिंग उपक्रमाकरिता कामे पाहणे तसेच LSC चे व्यवस्थापन करणे, उपक्रम निहाय लेखे व बैठकीचे इतिवृत्त अद्यावत ठेवणे आणि वैविध्यपूर्ण उपक्रमाची अंमलबजावणी करणे.<br>७. प्रभागांमधील विविध प्रक्रिया युनिट (Processing Unit), एकत्रीकरण सेंटर (Collection Center), निविष्ठा यांची नियमित देखरेख करणे तसेच महिलांना तांत्रिक सहाय्य करणे.<br>८. LSC कामाच्या प्रगतीचा आढावा घेणे, अद्यावत प्रगतीचा MIS राखणे इ. |
| | निवड प्रक्रिया | १. लेखी परीक्षा ४० गुण व तोंडी परीक्षा १० गुण. |
| | | **लेखी व तोंडी परीक्षेचे निकष :**<br>• लेखी परीक्षेची काठीण्य पातळी डिप्लोमा राहील<br>• लेखी परीक्षेचे विषय व गुणांकन पुढीलप्रमाणे राहील.<br>- बुद्धिमत्ता चाचणी – ५ गुण<br>- गणित – ५ गुण<br>- कृषी व कृषी सलग्न – ३० गुण<br>• सदर परीक्षा हि बहुपर्यायी असेल.<br>• तोंडी परीक्षा हि १० गुणांची असेल. तोंडी परीक्षेमध्ये संबधित व्यक्तीचे संवाद कौशल्य, कामाचा अनुभव, प्रात्यक्षिक अनुभव यांसारख्या बाबींच्या आधारावर गुणांकन करण्यात येईल. |
| | अर्जासोबत जोडावयाचे कागदपत्रे | • शैक्षणिक कागदपत्राच्या छायांकित प्रती<br>• आधार कार्ड छायांकित प्रत<br>• रहिवासी दाखला<br>• वाहन चालविण्याचा परवाना |

| अ. क्र. २ | पदाचे नावे – | **वरिष्ठ समुदाय संसाधन व्यक्ती (Senior CRP)** |
|---|---|---|
| | पद संख्या | एकूण १५ पदे {तालुका वर्धा – ३ पदे (प्रभाग-आंजी मोठी,तरोडा, तळेगाव टा.), देवळी – ४ पदे (प्रभाग- गौळ, गुंजखेडा, अंदोरी, भिडी), सेलू – ४ पदे (प्रभाग-सेलू, झडशी, येळाकेळी, हिंगणी), समुद्रपूर – ४ पदे (प्रभाग-मांडगाव, कांढळी, कोरा, नंदोरी) } |
| | मानधन | प्रवास देयकासह दरमहा कमाल मानधन रु. ७५००/-<br>(निच्छित मासिक प्रवास देयक रु. १५००/- इतके समाविष्ट राहील व मूल्यमापन अहवालानुसार मासिक मानधन अदा करण्यात येईल.)<br>सदर मानधन एकात्मिक शेती प्रभाग संघाची मालकी दिलेल्या प्रभागसंघातून करण्यात येईल. |
| | शैक्षणिक अर्हता | १. किमान १२ वी पास<br>२. उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोनती अभियानातील कृषी सखी, पशु सखी, उद्योग सखी, मास्टर कृषी सखी, मत्स्यसखी, BDSP, वन सखी इ. पदावर किमान ३ वर्ष कामाचा अनुभव असणे आवश्यक.<br>३. संबंधित तालुक्यातील रहिवासी असणे आवश्यक. |
| | अनुभव | उमेद अभियानात किमान ३ वर्ष काम केल्याचा अनुभव आवश्यक. |
| | निवडीचे निकष | १. वय : कमाल ४३ वर्ष<br>२. समुदाय संसाधन व्यक्ती हि कार्यक्षेत्रात उपजीविका सखी – उदा. कृषी सखी, पशु सखी, M-CRP (कृषी), उद्योग सखी, वन सखी इ. मध्ये कार्य करणारी असावी.<br>३. उत्तम संवाद कौशल्य असणे आवश्यक व समुदायाला सुलभरीतीने समजावून सांगता येणे आवश्यक.<br>४. विविध ३-५ गावात काम करण्याची तय्यारी असावी.<br>५. निवासी प्रशिक्षणास उपस्थित राहण्याची तय्यारी असावी.<br>६. ग्रामसंघ व उत्पादक गटाचे लेखे लिहिण्याचा अनुभव असावा.<br>५. मार्केटिंग उपक्रम करीता काम पाहण्याची तय्यारी असावी. |
| | भूमिका व जबाबदाऱ्या | १. CRP च्या क्लस्टरमधील गावपातळीवर उपजीविका CRP's द्वारे प्रशिक्षण देणे आणि अंमलबजावणीला सहकार्य करण्याची प्राथमिक जबाबदारी असेल.<br>२. उपजीविका उपक्रम वृद्धी व संसाधन सेवा केंद्राचे व्यवस्थापन पाहणे.<br>३. उपजीविका CRP's च्या माध्यमातून एकात्मिक शेती प्रभागात प्रस्तावित उपक्रमातून जास्तीत जास्त शेतकरी यांच्या पर्यंत सेवा पुरविणे..<br>४. IFC प्रभागाच्या सूक्ष्म नियोजन आराखडा अनुसार, हंगामपुर्वी शेतकऱ्यांची उपक्रम निहाय माहिती जमा करणे, त्याबद्दलचा अहवाल CLF व LSC कार्यकारिणी समितीच्या समोर सादर करणे.<br>५. एकात्मिक शेती प्रभागाचे लेखे नियमित अद्यावत राखणे. |

| | | |
|---|---|---|
| | | ६. उत्पादनाच्या मार्केटिंग करण्यासाठी प्रभागाला मदत करणे.<br>७. प्रभागातील महिलांच्या उपक्रमांना (शेतातील पिके, शेती आधारित उपक्रम) यांना प्रत्यक्ष भेट देऊन कामाचा आढावा घेणे व आवश्यक मार्गदर्शन करणे..<br>८. गरजेनुसार प्रशिक्षणाचे नियोजन करून अहवाल IFS Block Anchor व LSC कार्यकारिणी समिती समोर सादर करणे..<br>९. अद्यावत MIS राखणे.<br>१०. दरमहा केलेल्या कामाचा अहवाल IFC block anchor व LSC कार्यकारिणी समिती समोर सादर करणे.<br>११. प्रभागातील VO सह समन्वयाने काम करणे. |
| | निवड प्रक्रिया | १. लेखी परीक्षा ४० गुण व तोंडी परीक्षा १० गुण. |
| | | **लेखी व तोंडी परीक्षेचे निकष :**<br>• लेखी परीक्षेची पातळी १२ वी राहील<br>• लेखी परीक्षेत कृषी व कृषी सलग्न विषयी ५० % प्रश्न राहतील.<br>• तोंडी परीक्षा हि १० गुणांची असेल. तोंडी परीक्षेमध्ये संबधित व्यक्तीचे संवाद कौशल्य, कामाचा अनुभव, प्रात्यक्षिक अनुभव यांसारख्या बाबींच्या आधारावर गुणांकन करण्यात येईल.<br>• लेखी व तोंडी परीक्षेचे गुण एकत्रित करून जास्तीत जास्त गुण प्राप्त केलेल्या व्यक्तीची निवड करण्यात येईल. |

सदर दोन्ही पदाकरिता परिपूर्ण भरलेले अर्ज (शैक्षणिक कागदपत्राच्या छायांकित प्रतीसह) अंतिम दिनांक २५/०९//२०२५ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत व्यक्तीशः / टपालाद्वारे विहित मुदतीत जिल्हा अभियान सहसंचालक, उमेद – एमएसआरएलएम, वर्धा कार्यालय- जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जुनी जिल्हा परिषद इमारत, नेताजी चौक, जिल्हा सामान्य रूग्णालयाजवळ, सेवाग्राम रोड, वर्धा – ४४२००१ या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पोहचतील अशा बेताने सादर करण्यात यावे. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज स्वीकारले जाणार नाही याची नोंद घेण्यात यावी.